## दिवाणी डायरी अर्ज क्र. १/२०१८ मधील नि. क्र. १ वरील आदेश

१. सदरचा अर्ज अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ कलम १५३ अन्वये दाखल करुन असे नमुद केले आहे की, मुळ दाव्यात म्हणजेच रे. मु. नं ३८/ ११ मध्ये अर्जदार व सामनेवाला म्हणजेच दाव्यातील वादी व प्रतिवादी यांच्यात तडजोड झाल्याने तो दावा निकाली झालेला आहे. सदरचा दावा व निकालामध्ये दावा कलम १ मध्ये अनु.क्रं. ९ च्या मिळकतीचे म्हणजेच स. नं.३३ हिस्सा नं.७ या मिळकतीचे क्षेत्रफळातील ०.७६.०० हेक्टर या वर्णनातील ०.७६.०० या अंकावर काट मारुन तेथे ०.०७.६० व अनुक्रंमाक २२ च्या मिळकतींचे म्हणजेच स. नंबर ९७ हिस्सा नं. ८ या मिळकतींच्या क्षेत्रफळातील ०.१२.०० हेक्टर यावर काट मारुन तेथे ०.३२.०० हेक्टर तसेच निशाण ९७ च्या तडजोड पुरशीसमधील परिच्छेद नं.२ मधील ओळ नं. २ मधील पश्चिम हा शब्द खोडून तेथे पुर्व हा शब्द परिच्छेद नं. ९ मधील ओळ नं.२ मध्ये स्थानिक नाव वजर या शब्दानंतर आणि अनुक्रंमाक ५ या शब्दअंकापुर्वी पश्चिम दिशेची १/२ हिश्याची असे शब्द व अंक लिहिण्यास मिळावे अशी दुरुस्ती होवुन मिळावी याकरीता प्रस्तुतचा अर्ज केला आहे.

२. सामनेवाला क्र. १ ते १० यांनी नि. ८, ११, १३ व २२ येथे पुरशीस दाखल करुन अर्जदाराच्या अर्जास मान्यता दिली.

३. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नरहरी कवडे वि. हणमंता पुजारी २००४ ( ४ ) ऑल एम. आर. ३५६ या न्यायनिर्णयात नमुद केल्याप्रमाणे कोणत्याही पक्षकारास आपत्ती

नसेल तर डायरी अर्जात दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५३ चा आधार घेऊन वादपत्रात किंवा कैफीयतीमध्ये दुरुस्ती करता येते.

४. याच अनुषंगाने अर्जदाराच्या मुळ दाव्यातील वादपत्रात तसेच हुकुमनाम्यात व तडजोड पुरशीसमध्ये अर्जदार मागत असलेली दुरुस्ती करता येईल. यास्तव, मी खालील आदेश पारीत करते.

- आ दे श -

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. रे. मु. नं ३८/२०११ मधील वादपत्रात दावा कलम १ मधील अनुक्रमांक ९ च्या मिळकतीचे क्षेत्र ०.०७.६० हेक्टर, वादपत्रातील दावा कलम १ मधील अनुक्रंमाक २२ च्या मिळकतीतील क्षेत्र ०.३२.०० हेक्टर, तडजोड पुरशीसमध्ये परिच्छेद नं. २ मधील ओळ नं.२ येथे पश्चिम ऐवजी पुर्व, तडजोड पुरशीसमध्ये परिच्छेद नं.९ मधील ओळ नं. २ मध्ये स्थानिक नाव वजर या शब्दानंतर तसेच अनुक्रंमाक ५ या शब्दाअंकापुर्वी पश्चिम दिशेची १/२ हिश्याची असा मजकुर नमुद करुन तो तसा हुकुमनाम्यात घेण्यात यावा.

३. याकामी हुकुमनाम्याच्या नकक्ला जर पक्षकारांनी नेल्या असतील तर त्या मागवुन घेऊन आवश्यक ती दुरुस्ती त्यात करवुन घ्यावी.

( पी.आर.सबनिस )

दि. २३.०८.२०१९ न्यायदंडाधिकारी वर्ग - १,देवरुख.

-:CERTIFICATE:-

Judgment/order in (Order below Exh.1 in M.N.A.R.J.I No. 1/2018)

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | A.A.Shivalkar |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 23/8/2019 |
| Judgment signed by PO. on | :- | 23/8/2019 |
| Judgment uploaded on | :- | 27/8/2019 |